| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०८ ०९ २०२१ |
| नोंदणी तारीख | : | ०८ ०९ २०२१ |
| निकाल तारीख | : | ०८ ०५ २०२६ |
| कालावधी | : | व म दि |
| | | ०४ ०८ ०० |

## भाग १

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी वर्ग – १ यांचे न्यायालय, मालवण, जि. सिंधुदुर्ग**<br>(पीठासीन अधिकारी श्री.एम.के.फकीह )<br>(अधिघोषित दिनांक ०८/०५/२०२६ )<br>**नियमित फौजदारी खटला क्र. ७९/२०२१**<br>**सी.एन.आर.क्र.एमएचएसआय ०७०००४१६२०२१**<br>**निशाणी क्र.६१** |
| | प्रथम खबर अहवाल गुन्हा क्रमांक – ३८/२०२१<br>पोलीस स्टेशन – मालवण पोलीस स्टेशन |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे ठाणे प्रमुख<br>मालवण पोलीस स्टेशन, ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग |
| सहाय्यक सरकारी अभियोक्ता | श्री. टी.ए.भणगे/श्रीमती यु.आर.जाधव |
| आरोपी | पवन नामदेव कुसाळे<br>वय – २९ वर्षे, धंदा – इंजिनिअर<br>रा. – बी६, शांती उद्यान, आपटेनगर,<br>कोल्हापूर. |
| आरोपीतर्फे वकील | श्री.एस.एन.पई. |

# भाग २

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०३/०३/२०२१ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | ०४/०३/२०२१ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २४/०४/२०१८ |
| दोषारोप निश्चीतीची तारीख | ०८/०९/२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २०/०९/२०२२ |
| न्यायनिर्णय राखून ठेवण्याची तारीख | निरंक |
| न्यायनिर्णय तारीख | ०८/०५/२०२६ |
| शिक्षा सुनवल्याची तारीख, असल्यास | निरंक |

## आरोपीची माहीती

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नाव | आरोपीच्या अटकेची तारीख | आरोपीचे जामीनावर मुक्तता झाल्याची तारीख | आरोपी विरुध्द निश्चीत करण्यात आलेले गुन्हे | आरोपी ची निर्दोष मुक्तता अथवा दोषी ठरवण्यात आले | आरोपीस सुनवण्यात आलेली शिक्षा | कलम ४२८ फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार संपपरिक्षेच्या कालावधीमध्ये आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पवन नामदेव कुसाळे | ६.७.२१ | ६.७.२१ | भा.दं.वि. कलम ३७९ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

# भाग ३

## अ) अभियोग पक्षाचे साक्षीदार

| साक्षीदाराचा क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | विरेश रामचंद्र नाईक | घटनास्थळ पंच |

| | | |
|---|---|---|
| २. | सुप्रिया सुशांत पवार | ठाणे अंमलदार |
| ३. | सुभाष श्रीधर शिवगर | तपासी अधिकारी |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार**

| साक्षीदाराचा क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास**

| साक्षीदाराचा क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**<u>अभियोग पक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी</u>**

**अ) अभियोग पक्ष**

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | पी१/पीडब्ल्यू १ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | पी२/पीडब्ल्यू २ | फिर्याद |
| ३. | पी३/पीडब्ल्यू ३ | अंगझडती पंचनामा |
| ४. | पी४/पीडब्ल्यू३ | मुद्देमाल पावती |

**ब) बचाव पक्ष**

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन निशाणी**

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## ड) मुद्देमाल तपशील

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

# न्या य नि र्ण य

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३७९ (यापुढे संक्षेपार्थ 'भा.दं.वि.' असे संबोधण्यात येते) अन्वये दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

०२. **अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे आहे की,**

दि.०३/०३/२०२१ रोजी रात्री १०.०० वा. फिर्यादी कुटूंबासह तारकर्ली एमटीडीसी येथे जेवण करुन शतपावली करीता बाहेर गेले होते. तेथे समुद्राच्या दिशेने असलेले गजिबो (बसण्याचे लाकडी ठिकाण) ते बसले होते. त्यावेळी त्यांनी त्यांच्या हातातील सॅमसंग–ए–७० हा मोबाईल लाकडी बाकडयावर ठेवलेला होता. त्यानंतर ते उठून कुटूंबियासमवेत तारकर्ली एमटीडीसी येथील रेस्टॉरंटच्या दिशेने निघून गेले, त्यानंतर त्यांच्या लगेच लक्षात आले की, त्यांचा मोबाईल लाकडी बाकडयावर राहिलेला आहे. तो आणण्यासाठी ते गेले असता त्या ठिकाणी मोबाईल मिळून आला नाही. त्यांनी आजूबाजूला लोकांच्याकडे चौकशी केली असता देखील सदरचा मोबाईल मिळून आला नाही. त्यामुळे कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांच्या परवानगीशिवाय चोरी करण्याच्या उद्देशाने घेवून गेला आहे. म्हणून त्यांनी अज्ञात इसमाविरुध्द मालवण पोलीस स्टेशन येथे सदर घटनेबाबत फिर्याद दाखल केली.

०३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द मालवण पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र.३८/२०२१ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार एस.एस.शिवगण यांनी केला. तपासी अधिकारी यांनी

तपासादरम्यान घटनास्थळास भेट देवून घटनास्थळ पंचनामा तयार केला, घटनास्थळाची छायाचित्रे घेतली, भारतीय पुरावा कायदा कलमल ६५ब प्रमाणे प्रमाणपत्र घेतले, साबर सिंधुदूर्ग यांना सीडीआर एसडीआर मिळणेबाबतक पत्र दिले, साक्षीदारांकडे चौकशी करुन साक्षीदारांचे जबाब नोंदवले, पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांना गुन्हयाच्या तपासाकरीता कोल्हापूर व सांगली येथे जाण्यास परवानगी मिळणेबाबत बिनतारी संदेश देवून परवानगी मिळाल्याबाबत बिनतारी संदेश प्राप्त केला, आरोपीच्या अंगझडतीमधून मिळालेला मोबाईल जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला, तपास पुर्ण झाल्यानंतर ठाणे प्रमुखांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

०४. माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपीविरुध्द नि.क्र.११ वरती दोषारोप निश्चित केले आहे. आरोपीला दोषारोपपत्रातील मजकूर वाचून व समजावून सांगितला असता आरोपीने दोषारोपाचा इन्कार करुन प्रकरणाची संपरिक्षा करण्याची विनंती केली.

०५. आरोपीचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार नि.क्र.५९ वर निवेदन नोंदविण्यात आले. आरोपीस अभियोगपक्षाच्या पुराव्यात त्याच्याविरुध्द आलेला पुरावा वाचून व समजावून सांगितला असता आरोपीने त्याच्याविरुध्द आलेल्या पुराव्याचा इन्कार करुन त्याच्याविरुध्द खोटे प्रकरण दाखल केले असल्याचा बचाव घेतला आहे. आरोपीने त्याच्या बचावार्थ कुठलाही तोंडी अथवा लेखी पुरावा दाखल केला नाही.

०६. सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती यु. आर.जाधव व आरोपीतर्फे वकील श्री.एस.एन.पई यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावर आलेला पुरावा व उभयपक्षाच्या युक्तिवादाच्या अनुषंगाने माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले असून मी त्याचे निष्कर्ष खालील कारणमीमांसेसह नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, एमटीडीसी तारकर्ली येथे आरोपीने सॅमसंग कंपनीचा मॉडेल नं.ए–७० हा मोबाईल फिर्यादीच्या संमती विना चोरुन नेवुन **भा.दं.वि. कलम ३७९** अन्वये गुन्हा केलेला आहे ? | : | नकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मी मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ बाबत –</u>**

०७. सा.क्र.१ विरेश यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये पोलिसांनी एमटीडीसी तारकर्ली येथे त्यांचे समक्ष जागेची पाहणी करुन <u>नि.क्र.पी१/पीडब्ल्यू१</u> चा घटनास्थळ पंचनामा केल्याचे सांगितले आहे. सा.क्र.१ विरेश यांचा विस्तृत असा उलटतपास घेतला असताही त्यांच्या पुराव्यास छेद देणारा कुठलाही पुरावा अभिलेखावरती आलेला नाही.

०९. सा.क्र.२ सुप्रिया हया ठाणे अंमलदार असून त्यांनी दि. ०४/०३/२०२१ रोजी फिर्यादीची <u>नि.क्र.पी२/पीडब्ल्यू२</u> ची तक्रार फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नोंदविल्याचे सांगितले आहे.

१०. सा.क्र.३ सुभाष हे तपासिक अंमलदार असून त्यांनी गुन्हा क्र. ३८/२०२१ चे तपासकामी पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला, आरोपीच्या ताब्यातून चोरीला गेलेला मोबाईल <u>नि.क्र.पी३/पीडब्ल्यू३</u> च्या अंगझडती पंचनाम्याने जप्ती करुन <u>नि.क्र.पी४/पीडब्ल्यू३</u> ची मुद्देमाल पावती फाडल्याचे

सांगितले आहे. तसेच त्यांनी पुढे आरोपीविरुध्द सबळ पुरावा आल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्याचे सांगितले आहे.

११. कलम ११४ उदाहरण (अ) भारतीय पुरावा कायद्यानुसार चोरी झाल्यानंतर लगेचच चोरी झालेला मुद्देमाल ज्याच्याकडून मिळालेला आहे, त्या व्यक्तीने सदरची चोरी केली आहे अथवा सदर व्यक्तीने सदरची वस्तू चोरीची आहे हे माहीत असतानाही प्राप्त केली आहे असे गृहीतक काढण्यात येते. कलम ११४ उदाहरण (अ) भारतीय पुरावा कायद्याचे गृहीतक लागू करण्याकरिता अभियोग पक्षाने सर्वप्रथमतः जप्त करण्यात आलेला मोबाईल चोरीचा आहे ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे. सा.क्र.२ सुप्रिया हिच्या पुराव्यातून फिर्यादीने दिलेली फिर्याद शाबीत केली असली तरी प्रस्तुत कामी अभियोग पक्षाने फिर्यादीची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे फिर्याद मधील कथने योग्यरित्या शाबीत झालेली नाहीत.

१२. तसेच एमटीडीसी येथे सीसीटीव्ही असताना देखील तपासिक अंमलदार यांनी ते हजर केलेले नाही. अभियोग पक्षाने अंगझडती पंचनाम्यावरील पंच साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली नाही. तसेच तपासिक अंमलदार यांनी आपल्या उलट तपासामध्ये त्यांना कोणत्याही साक्षीदाराने आरोपीने मोबाईलची चोरी करताना पाहिले होते असे सांगितले नसल्याचे मान्य केले आहे.

१३. याशिवाय जप्त करण्यात आलेल्या मोबाईलची कुठलीही ओळख न्यायालयासमक्ष पटवून घेण्यात आलेली नाही. त्यामुळे जप्त करण्यात आलेला मोबाईल हा चोरीचाच मोबाईल असल्याबाबत कुठलाही पुरावा न्यायालयासमक्ष आलेला नाही. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची न्यायालयासमक्ष ओळख न सिध्द झाल्यामुळे जप्त करण्यात आलेला मोबाईल चोरीचाच मोबाईल आहे ही बाब सिध्द होवू शकलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये कलम ११४ उदाहरण (अ) भारतीय पुरावा कायद्याचे गृहीतक लागू होत नाही. सबब, अभियोग पक्ष

आरोपीने चोरी केली होती असा दर्शविणारा कुठलाही प्रत्यक्षदर्शी अथवा परिस्थितीजन्य पुरावा सादर न केल्यामुळे आरोपीविरुध्द कुठलाही गुन्हा सिध्द होत नाही. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे. मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी दिल्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्याअनुषंगाने मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | **आदेश** |
|---|---|
| १. | आरोपी पवन नामदेव कुसाळे याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३७९ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपीचे व जमानतदारांचे बंधपत्रे व जामीन रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | गुन्हयातील जप्त सॅमसंग मोबाईल मॉडेल क्र.ए–७० हा त्याच्या मूळ मालकास स्वामित्वाची खात्री करुन परत देण्यात यावे. त्याबाबत संबंधितांनी सदर मोबाईलच्या मूळ मालकास नोटीस काढून त्याबाबत माहीती दयावी. नोटीस प्राप्त झाल्यापासून सहा महीने पूर्ण होईपर्यंत जप्त मोबाईलची कोणीही मागणी न केल्यास सदरील मुद्देमाल बेवारस समजून त्याची जाहीर लिलावात विक्री करून विक्री रक्कम शासन तिजोरी जमा करण्यात यावी. |
| ४. | आरोपीने कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार माननीय अपिलार्थी न्यायालयाने नोटीस निर्गमीत करुन हजर राहण्यास आदेशीत केल्यास अपिलार्थी न्यायालयासमक्ष हजर राहण्याबाबत १५,०००/– रुपयांचे वैयक्तिक बंधपत्र व सदर रकमेचे जामीनदार द्यावे. |
| | (खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय अधिघोषित.) |

सही/–
एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग १, मालवण.

ठिकाण : मालवण
दिनांक :०८/०५/२०२६